क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ५१६८
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - १० /०८/२०१८

प्रति,

१. सर्व उपनियंत्रक शिधावाटप, परिमंडळ कार्यालये
२. सर्व शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालये

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे नियमित मासिक नियतन माहे सप्टेंबर, २०१८**

**संदर्भ :-** १. शासननिर्णय क्र. : असुका-२०१७/प्र.क्र.६०/नापु-२२, दि.०३.०३.२०१७
२. शासनपत्र क्र. अधापु-२०१८/प्र.क्र.३५/ना.पु.-२२, दि. ०९ मे, २०१८

उपरोक्त संदर्भाधीन शासनपत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे सप्टेंबर, २०१८ करीता ८७६५६९१ प्राधान्य कुटुंबातील लाभार्थी सदस्य संख्येसाठी १७५३१ मे. टन तांदूळ व २६२९७ मे. टन गहू असे एकूण ४३८२८ मे. टन अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे.

सदर नियतनाच्या अनुषंगाने माहे सप्टेंबर, २०१८ करिता राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ च्या प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे परिमाण प्रति व्यक्ति ५ किलो अन्नधान्य (तांदूळ २ किलो व गहू ३ किलो) असे आहे.

शासनपत्र क्र. असुका/२०१४/प्रक्र.१०६/ना.पु.२२, दि. १ ऑगस्ट, २०१४ अन्वये प्राप्त सुचनेनुसार प्रत्येक महिन्याच्या नियतनाची उचल ही त्या पूर्वीच्या महिन्याच्या अखेरच्या तारखेपर्यंत पूर्ण करावयाची आहे. यापुढे भारतीय अन्न महामंडळाकडून तसेच केंद्र शासनाकडून मुदतवाढ दिली जाणार नसल्याने संपुर्ण नियतनाची उचल नियतनाच्या मागील महिन्याच्या शेवटच्या तारखेपर्यत पूर्ण होईल व लाभार्थ्यांना विहित वेळेत धान्य पूरवठा केला जाईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

सर्व परिमंडळ कार्यालयांकडून प्राधान्य कुटुंब योजनेच्या शिधापत्रिका, लोकसंख्या व अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये माहे जुलै, २०१८ अखेरच्या शिल्लक साठ्याबाबतची माहिती संगणकावर भरण्यात आली आहे. त्यानुसार एकूण लोकसंख्या ही ८६०४४२२ अशी आहे.

सदर माहितीनुसार परिमंडळनिहाय आकडेवारी व माहे सप्टेंबर, २०१८ करिता मंजूर नियतन खालीलप्रमाणे आहे.

(आकडे मे. टन मध्ये)

| परिमंडळ | शिधापत्रिका व लोकसंख्या. | | अ.शि.वा. दुकानातील माहे जुलै, २०१८ अखेरचा शिल्लक साठा | | मासिक आवश्यकता (१००% गरज) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शिधापत्रिका | लोकसंख्या | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| अ | १७९४०१ | ८२८१२१ | ६५२.१४६ | ९४९.३८६ | १६५६.२४२ | २४८४.३६३ |
| ड | २२७९१४ | १०२६५९२ | ६०७.२६६ | ९४१.२१५ | २०५३.१८४ | ३०७९.७७६ |
| ई | ५१११०६८ | २४२८१६६ | १०६७.३९२ | १७५३.३४० | ४८५६.३३२ | ७२८४.४९८ |
| ग | २६३६३८ | ११९९२९८ | ५९५.५०० | ८९५.४७२ | २३९८.५९६ | ३५९७.८९४ |
| फ | ७०३७९० | ३१२२२४५ | ८७१.१०८ | १३५८.८६२ | ६२४४.४९० | ९३६६.७३५ |
| एकूण | १८८५८११ | ८६०४४२२ | ३७९३.४१२ | ५८९८.२७५ | १७२०८.८४४ | २५८१३.२६६ |

## माहे सप्टेंबर, २०१८ करीता प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत परिमंडळनिहाय मंजूर नियतन

(आकडे मे. टन मध्ये)

| अ. क्र. | परिमंडळ | माहे सप्टेंबर, २०१८ करिता मंजूर नियतन | | अ.शि.दुकानातून अतिरिक्त शिल्लक साठा | |
|---|---|---|---|---|---|
| | | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| १ | अ | १०१२.०६० | १५४४.९६७ | ७.९६४ | ९.९९० |
| २ | ड | १४४६.०१२ | २१३८.७०८ | ०.०९४ | ०.१४७ |
| ३ | ई | ३७८८.९४० | ५५३१.१५८ | ०.००० | ०.००० |
| ४ | ग | १८०४.९३० | २७०२.६४३ | १.८३४ | ०.२२१ |
| ५ | फ | ५३७५.११८ | ८०१०.५१४ | १.८१६ | २.६४१ |
| | एकूण | १३४२७.१४० | १९९२७.९९० | ११.७०८ | १२.९९९ |

काही अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये मासिक १००% आवश्यकतेपेक्षा जास्त साठा शिल्लक असल्याने, त्या दुकानांचे समोर मंजूर नियतनात ०.०० (निरंक) अशी आकडेवारी दर्शविण्यात आली असून सदर अतिरीक्त साठा हा वरील तक्त्यामध्ये स्वतंत्र रकान्यात दर्शविण्यात येत आहे.

ज्या अधिकृत शिधावाटप दुकानांमध्ये मासिक गरजेपेक्षा जास्त साठा शिल्लक आहे, अशा दुकानांमधून मासिक १००% गरजेपेक्षा जास्त वितरण होणार नाही व अतिरिक्त साठा पुढील महिन्यासाठी दुकानात शिल्लक राहील याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना क्षेत्रीय कर्मचाऱ्यांमार्फत देण्यात याव्यात.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत शिधापत्रिकाधारकांना विहीत वेळेत अन्नधान्य पोहोचण्याच्या व उचल पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून माहे सप्टेंबर, २०१८ करीता प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांसाठी मंजूर नियतनानुसार तात्काळ रक्कम भरण्याबाबत सूचना सर्व अधिकृत शिधावाटप दुकानांना द्याव्यात व वाहतूक कंत्राटदारास त्वरीत वितरण आदेश देण्यात यावेत. तथापि, १००% वितरण आदेश दिनांक २७.०८.२०१८ पर्यंत निर्गमित करण्यात यावे. वाहतूक कंत्राटदारांनी या योजनेतील अन्नधान्याची उचल कोणत्याही परिस्थितीत दि. १५.०८.२०१८ पर्यंत ४०%, दि. २५.०८.२०१८ पर्यंत ८०% व दि. ३१.०८.२०१८ पर्यंत १००% पूर्ण करावी.

तसेच, संदर्भाधीन शासनपत्रान्वये खालीलप्रमाणे सुचना देण्यात आल्या असून त्याचे पालन करण्यात यावे.

अ) सदर नियतन मंजूरीचे दुकाननिहाय तक्ते ई-मेलद्वारे परिमंडळ कार्यालयांना पाठविण्यात आले आहेत. दुकाननिहाय नियतन प्राप्त न झाल्याने धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

ब) भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

तसेच, सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर उपसंचालक नागरी पुरवठा (गो/वा) कार्यालयाने तात्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासन नियतन आदेशापूर्वी शासनास प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

क) सदर धान्य राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ मधील कार्यपद्धतीप्रमाणे वितरीत करण्याची सर्व परिमंडळ उपनियंत्रक शिधावाटप यांनी दक्षता घेण्यात यावी. शिधापत्रिकाधारकांस अ.शि.दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

अधिकृत शिधावाटप दुकानदारांनी अन्नधान्याची मागणी न नोंदविल्यास अथवा वाहतूक कंत्राटदारांनी मुदतीत १०० % धान्याची उचल न केल्यास त्यांचेविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या शिधाजिन्नसांचा गैरव्यवहार होणार नाही याची दक्षता उप नियंत्रक शिधावाटप व शिधावाटप कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी घ्यावी. त्यासाठी अधिकृत शिधावाटप दुकानांच्या मानकाप्रमाणे व रोस्टरनुसार नियमित व अचानक तपासण्या कराव्यात. तसेच या कार्यालयाचे परिपत्रक दि. २२/०७/२००९, दि. ३०/०७/२००९ तसेच अन्नधान्य वाहतूकीचे ट्रॅकिंग बाबतचे परिपत्रक दिनाक १८/०९/२०१४ मध्ये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

सदर माहे सप्टेंबर, २०१८ च्या प्राधान्य कुटुंब योजनेच्या नियतनापैकी उचल व वाटप केलेल्या अन्नधान्याचा साप्ताहिक तसेच पाक्षिक अहवाल न चुकता या कार्यालयास तसेच उपसंचालक, नागरी पुरवठा (गो/वा) यांना पाठवावा.

(दिलीप शिंदे)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत माहितीस्तव अग्रेषित :-

१. मा. खाजगी सचिव, राज्यमंत्री, अनापु व ग्रासंवि आणि सा.बां.वि., मंत्रालय, मुंबई.
२. मा.खासदार, सर्व मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
३. मा.आमदार, सर्व मुंबई /ठाणे शिधावाटप क्षेत्र, ( संबंधीत परिमंडळामार्फत )
४. मा.महापौर, मुंबई, नवी मुंबई,ठाणे,कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईंदर महानगरपालिका(संबंधीत परिमंडळामार्फत)
५. मा.आयुक्त, महानगरपालिका, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी. मिरा-भाईंदर महानगरपालिका (संबंधीतपरिमंडळामार्फत)
६. मा.नगराध्यक्ष, अंबरनाथ, बदलापूर. ( संबंधीत परिमंडळामार्फत )
७. उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, ४२ सर वि.ठा.मार्ग, मुंबई
९. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२ व २८ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
१०. पर्यवेक्षक अधिकारी, श्रम मंत्रालय, ७१ बी श्रम साफल्य, एन.जी.आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.
११. रेशनिंग कृती समिती, आर.एच.४, सी - ४,लेन- ८, सेक्टर ९ सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई १४.
१२. श्री. रेडकर संघटक, घरकाम मोलकरीण संघटना, भुपेश गुप्ता भवन, ८५-सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.
१३. घरकाम मोलकरीण संघटना, मुंबई जिल्हा अंधेरी, घन:श्याम पाटील चाळ,एस.व्ही.रोड,अंधेरी (प), मुं-५८
१४. विशेष कार्यकारी अधिकारी, कामगार आयुक्तांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पू.), मुंबई-५१.
१५. संदीप सुमन,रेशनिंग व जिविका हक्क संघटना, नवीन बीडीडी चाळ नं. १५/५६, महात्मा ज्योतिबा फुले मार्ग, नायगांव, मुं. १४.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सह.पणन महासंघ मर्या.,कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई.
२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचलनालय, मुंबई.
३. उप सचालक, नागरी पुरवठा (गो/वा) परेल, मुंबई.
४. उप संचालक नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, शासकीय कुटीर क्र.५, फ्रि प्रेस जर्नल मार्ग, मुं-२१
५. श्री जे.बी. ग्रेन डिलर्स असो., वाहतूक कंत्राटदार, 'अ' परिमंडळ. (परिमंडळ कार्यालयामार्फत)
६. क्रिएटिव्ह ग्रेन्स अँड ट्रान्स. सर्व्हिस प्रा.लि., वाहतूक कंत्राटदार, 'ड' परिमंडळ (परिमंडळ कार्यालयामार्फत)
७. शिरिष कार्गो सर्व्हिसेस प्रा.लि., वाहतूक कंत्राटदार, 'ई' परिमंडळ (परिमंडळ कार्यालयामार्फत)
८. साईनाथ ग्रेन ट्रेडर्स प्रा.लि., वाहतूक कंत्राटदार, 'ग' परिमंडळ (परिमंडळ कार्यालयामार्फत)
९. आकाश ग्राहक सहकारी संस्था मर्या., वाहतूक कंत्राटदार, 'फ' परिमंडळ (परिमंडळ कार्यालयामार्फत)
१०. कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, प्रशासन शाखा, व नियंत्रण कक्ष, प्रधान कार्यालय.

क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ५३१
नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - २४/०८/२०१८

प्रति,

१. उप नियंत्रक शिधावाटप, " अ व ग " परिमंडळ.
२. उप संचालक (गो), संनापु, परेल
३. शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्रमांक २७-ग गोरेगाव, २८-ग कांदिवली, ४३-ग बोरीवली व १३-अ माझगांव.

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे सुधारीत नियतन - माहे सप्टेंबर, २०१८.**

**संदर्भ :-** १. क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.५१६,दि.१०.०८.२०१८
२. क्र. गप/मागणी/२०१८/जा. ३८२७, दिनांक १४.०८.२०१८
३. क्र. गप/मागणी/२०१८/जा. ३८५२, दिनांक २०.०८.२०१८
४. क्र. अपरि/मागणी/२०१८/जा.३७४७, दि. २०.०८.२०१८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे सप्टेंबर, २०१८ करीता प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे.

सदर दुकाननिहाय नियतनासाठी शिल्लक साठा कळविताना शिधावाटप कार्यालय क्रमांक २७-ग गोरेगाव, २८-ग कांदिवली, ४३-ग बोरीवली व १३ अ माझगांव या कार्यालयांची अ.शि. दुकानातील शिल्लक साठा बाबतची माहिती चुकीची कळविण्यात आल्याने सदर कार्यालयांनी सादर केलेल्या सुधारीत माहितीनुसार, माहे सप्टेंबर, २०१८ करिता सुधारीत नियतन निर्गमित करण्यात यावे अशी विनंती ग व अ परिमंडळ कार्यालयाचे उपरोक्त संदर्भाधीन पत्रांन्वये करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंब योजनेचे लाभार्थी त्यांना देय शिधाजिन्नसांपासून वंचित राहू नयेत म्हणून सदर दुकानांना माहे सप्टेंबर, २०१८ करिता सुधारीत नियतन मंजूर करण्यात येत आहे. अधिकृत शिधावाटप दुकाननिहाय सुधारीत नियतनाचा तक्ता सोबत जोडला आहे.

वरीलप्रमाणे अ.शि. दुकानांना सुधारीत नियतन मंजूर केल्यानंतर मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी माहे सप्टेंबर, २०१८ करिता प्राधान्य कुटुंब योजनेचे सुधारीत नियतन खालीलप्रमाणे आहे.

(आकडे मे.टनात)

| कार्यालय | दि. १०.०८.२०१८ च्या पत्रान्वये माहे सप्टेंबर, २०१८ करिता मंजूर नियतन | | माहे सप्टेंबर, २०१८ करिता सुधारीत मंजूर नियतन | | नियतनामध्ये वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| १३-अ माझगांव | ८४.४६२ | १३५.९५८ | ९३.७१३ | १४६.४५४ | ९.२५१ | १०.४९६ |
| २७-ग गोरेगाव | ३६१५.१९ | ५३७७.०० | ३६९७.३४ | ५५०८.०४ | ८.२१५ | १३.१०४ |
| २८-ग कांदिवली | ४६०८.२४ | ६९१७.८७ | ४७१८.९९ | ७०३९.१४ | ११.०७५ | १२.२०७ |
| ४३-ग बोरीवली | २०८६.३८ | ३१३२.०८ | २५३१.७१ | ३७९२.८१ | ४४.५३३ | ६६.०७३ |
| | | | | | | |
| अ परिमंडळ | १०१२.०६० | १५४४.९६७ | १०२१.३११ | १५५५.४६३ | ९.२५१ | १०.४९६ |
| ग परिमंडळ | १८०४.९३० | २७०२.६४३ | १८६८.७५३ | २७९४.०२७ | ६३.८२३ | ९१.३८४ |
| मुबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र | १३४२७.१४० | १९९२७.९९० | १३५००.२१४ | २००२९.८७० | **७३.०७४** | **१०१.८८** |

तसेच, संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना कायम रहातील.

(दिलीप शिंदे)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत :

१. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय, जी.टी. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई.

क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र. ५४२

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा
यांचे कार्यालय, एक्सप्रेस इमारत, २ रा मजला,
चर्चगेट, मुबई-४०० ०२०
दूरध्वनी क्रमांक २२०४१८०३/२२०४२८६६
E mail : dycor.ho-mum@gov.in

दिनांक - २४/०८/२०१८

प्रति,

१. उप नियंत्रक शिधावाटप, "ड" परिमंडळ.
२. उप संचालक (गो), संनापु, परेल
३. शिधावाटप अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्रमांक
२५-ड अंधेरी (प) .

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यासाठी अन्नधान्याचे सुधारीत नियतन - माहे सप्टेंबर, २०१८.**

**संदर्भ :-** १. क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.५१६, दि.१०.०८.२०१८
२. क्र. निशि/मागणी/२०१८/का.क्र.२/प्रा.कुटुंब/जा.क्र.५३१, दि.२४.०८.२०१८
३. क्र.डप/मागणी/२०१८/जा.४७३, दि.२३.०८.२०१८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ च्या पत्रान्वये मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत माहे सप्टेंबर, २०१८ करीता प्राधान्य कुटुंब योजनेच्या लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे नियतन मंजूर करण्यात आले आहे.

सदर दुकाननिहाय नियतनासाठी शिल्लक साठा कळविताना अ.शि. दुकान क्रमांक २५-ड १५, १४४, १५८, १५८ एन(९६) चा प्राधान्य कुटुंब योजनेच्या अन्नधान्याचा माहे जुलै अखेर शिल्लक साठा कळविताना चुकीचा कळविल्याने सुधारीत नियतन मंजूर करावे असे अशी विनंती ड परिमंडळ कार्यालयाचे उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत प्राधान्य कुटुंब योजनेचे लाभार्थी त्यांना देय शिधाजिन्नसांपासून वंचित राहू नयेत म्हणून उपरोक्त अ.शि. दुकानांसाठी माहे सप्टेंबर, २०१८ करिता सुधारीत नियतन मंजूर करण्यात येत आहे.

सदर अ.शि. दुकानांना सुधारीत नियतन मंजूर केल्यानंतर मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी माहे सप्टेंबर, २०१८ करिता प्राधान्य कुटुंब योजनेचे सुधारीत नियतन खालीलप्रमाणे आहे.

(आकडे मे.टनात)

| कार्यालय | दि. १०.०८.२०१८ व २४.०८.२०१८ च्या पत्रान्वये माहे सप्टेंबर, २०१८ करिता मंजूर नियतन | | माहे सप्टेंबर, २०१८ करिता सुधारीत मंजूर नियतन | | नियतनामध्ये वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | गहू |
| शि.वा.का.क्र. २५-ड अंधेरी (प) | ३००.१०० | ४४३.५६३ | ३०२.४१० | ४४८.६४० | | |
| ड परिमंडळ | १४४६.०१२ | २१३८.७०८ | १४४८.३२२ | २१४३.७८५ | २.३१० | ५.०७७ |
| मुबई ठाणे शिधावाटप क्षेत्र | १३५००.२१४ | २००२९.८७० | १३५०२.५२४ | २००३४.९४७ | | |

तसेच, संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचना कायम रहातील.

(दिलीप शिंदे)
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रत :

१. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.२२, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
२. वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे कार्यालय, जी.टी. हॉस्पिटल कंपाऊंड, मुंबई.